**<u>पूर्व मंजूरीसाठी</u>**

**प्रकल्प प्रवर्तक मे. कॅमेलियन अँरॉन केमिकल्स प्रा. लिमिटेड, सर्व्हे नं. १४३, १४४ आणि १४५, गाव-कैरे, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र (४१० २२०) यांच्या प्रस्तावित इमेंजिग रसायन निर्मिती – १३४.० मे.टन/महिना प्रस्तावित विस्तार प्रकल्पाकरिता पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीबाबतचे इतिवृत-**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. कॅमेलियन अँरॉन केमिकल्स प्रा. लिमिटेड, सर्व्हे नं. १४३, १४४ आणि १४५, गाव-कैरे, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र (४१० २२०) यांच्या प्रस्तावित इमेंजिग रसायन निर्मिती – १३४.० मे.टन/महिना प्रस्तावित विस्तार प्रकल्पाकरिता पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार दिनांक ,३१ मे, २०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजता सॅम्युअल हॉल, दुसरा मजला, जुना मुंबई-पुणे हायवे (एन.एच. ४), खोपोली, जिल्हा-रायगड (४१० २०३) येथे आयोजित करण्यात आलेली होती .

श्री प्रशांत भोसले ,उप प्रादेशिक अधिकारी ,रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ , रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर -११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४ तथा आयोजक पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी , मा. श्री संदेश शिर्के अप्पर जिल्हादंडाधिकारी ,रायगड, अलिबाग तथा अध्यक्ष ,पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती , श्री जयवंत शं. हजारे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड, तथा सदस्य, यांचे स्वागत केले तसेच पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी चॅनलचे प्रतिनिधी व ,पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था ,पत्रकार ,मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली .

आयोजक ,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ए - ५ (एफ) मध्ये (सिंथेटीक ऑरगॅनिक केमिकल्स इंडस्ट्री) मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण वने व नवी दिल्ली यांची ,भारत सरकार ,हवामान बदल मंत्रालय "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रस्तावित प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे, आणि प्रकल्पामुळे विस्तापित होणा-या जनतेच्या रहिवाशांच्या समस्या जाणून घेणे हा आहे. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीत सहभागी असलेल्या स्थानिकांनी, जनतेने प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेल्या पर्यावरणीय सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप यांची नोंद घेऊन त्याचा बैठकीच्या इतिवृतात समावेश करणे व सदरहू इतिवृत शासनास सादर करणे हा आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, (भारत सरकार), दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक २२-०६-२०२३ रोजी सादर केला व त्या अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक २१-०७-२०२३ रोजी प्रदान केली आणि सदरहू प्रकल्पास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यास अनुमती प्रदान केलेली आहे. त्यानुसार प्रकल्प प्रवर्तकांनी प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करुन शासनास सादर केलेला आहे.

त्यानंतर प्रकल्प प्रवर्तक मे. कॅमेलियन अँरॉन केमिकल्स प्रा. लिमिटेड, सर्व्हे नं. १४३, १४४ आणि १४५, गाव-कैरे, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र (४१० २२०) यांच्या प्रस्तावित इमेंजिग रसायन निर्मिती – १३४.० मे.टन/महिना प्रस्तावित विस्तार प्रकल्पाकरिता पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास रितसर अर्ज दिनांक २६.१०.२०२३ रोजी सादर केला.

सहसंचालक (मप्रनि), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र दिनांक ०७.११.२०२३ नुसार उप प्रादेशिक कार्यालय-रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई – ४१० २०१ यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

मा. जिल्हाधिकारी ,रायगड, यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास शुक्रवार दिनांक ,३१ मे, २०२४ रोजी दुपारी ०३ .०० वाजता मान्यता दिली त्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण ,वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांनी कार्यालयीन आदेश क्रं . ई -१३७२०२ / ४ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२३०५२९ एफटीएस ०१६० दिनांक ०९०-५२०२-४ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली: -

१) जिल्हादंडाधिकारी, रायगड, अलिबाग, -अध्यक्ष
किंवा त्यांचे प्रतिनिधी
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई - सदस्य
यांचे प्रतिनिधी —
प्रादेशिक अधिकारी -रायगड,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई- ४०० ६१४

३) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१, -आयोजक
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई- ४०० ६१४

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई- ४०० ६१४ यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकमत व कृषिवल याचे मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस याचे इंग्रजीत दिनांक ३०-०४-२०२४ रोजी सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत जाहिर सूचना प्रकाशित केलेली होतीत्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व . दस्तावेज लोकांच्याअवलोकनार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते —

१) क्षेत्रीय कार्यालय, पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय,पश्चिम मध्य झोन, नविन सचिवालय इमारत, तळमजला, पूर्व बाजू,सिव्हिल लाईन्स, नागपूर — ४४० ००१
२) जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड,अलिबाग,
३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड,अलिबाग,
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, रायगड,अलिबाग,
५) प्रांताधिकारी, प्रांत कार्यालय, कर्जत, जिल्हा-रायगड,
६) तहसीलदार, तहसील कार्यालय-खालापूर, तालुका- खालापूर, जिल्हा- रायगड,
७) गट विकास अधिकारी,पंचायत समिती,तालुका-खालापूर, जिल्हा- रायगड,
८) ग्रामपंचायत कार्यालये — मौजे-कैरे, मौजे-रिज, मौजे-तळेगाव, मौजे-पोसरी, मौजे-कसप मौजे-आपटा, मौजे-वडगाव, मौजे-चौक, तालुका-खालापूर,जिल्हा- रायगड,
९) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२.

१०) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - मुख्यालय, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

११) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४

१२) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४

१३) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी ,रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ,नवी मुंबई यांना एकही सूचना/आक्षेप प्राप्त झालेला नाही.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले ही समिती फक्त परिसरातील लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकारी या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना / आक्षेप यांची इतिवृत्तांत नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, वने व हवामान बदल विभाग, भारत सरकार नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पा .चा सद्याचा खर्च – रुपये २००.० लाख असून प्रस्तावित खर्च ५०० लाख म्हणजे एकूण रुपये ७००.० लाख खर्च होईल तर पर्यावरण व्यवस्थापनासाठी एकूण प्रकल्पाच्या १४% खर्च करण्यात येईल. पर्यावरण संरक्षणासाठी एकूण भांडवली खर्च रुपये -९८.० लाख रुपये - तर आवर्ती खर्च , १०.८० लाख रुपये आहे . सदरहू प्रकल्प हा शुन्य द्रव्य निकसन प्रकल्प आहे.

सादरीकरणानंतर आयोजक पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ,समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक आक्षेपसूचना असल्यास त्या नोंदविण्याचे , आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

**१) श्री सुरेश पाटील, राहणार-कैरे गाव, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-**

**प्रश्न -** कंपनीपासून पाताळगंगा ही नदी अगदी जवळच आहे. प्रकल्पात उत्पन्न होणा-या सांडपाण्यामुळे पाताळगंगा नदीस काही धोका उत्पन्न होईल काय?

**उत्तर -** पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण (Zero Liquid Discharge) प्रकल्प असून प्रकल्पात उत्पन्न होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा प्रकल्पातच पुनर्वापर करण्यात येणार आहे. प्रकल्पातून सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर सोडण्यात येणार नाही. त्यामुळे पाताळगंगा नदीस कुठलाच धोका उत्पन्न होणार नाही.

**२) <u>श्री अविनाश पाटील, राहणार-कैरे गाव, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-</u>**

**प्रश्न -** प्रकल्पात हवा प्रदूषण नियंत्रणासाठी काय उपाययोजना करण्यात येतील?

**उत्तर -** पर्यावरण सल्लागार यांनी माहिती दिली की प्रकल्प स्थानापर्यत महानगर गॅस निगमची पाईपलाईन आलेली असून त्याचे कनेक्शन घेण्यात येईल. प्रकल्पात इंधन म्हणुन नैसर्गिक गॅसचा वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रकल्प उत्पादनामुळे हवा प्रदूषणाचा धोका नाही.

**३) <u>श्री अभिजित पाटील, राहणार-कैरे गाव, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-</u>**

**प्रश्न -** प्रकल्प विस्तारिकरणानंतर प्रकल्पात किती स्थानिकांना रोजगाराची संधि देण्यात येईल?

**उत्तर -** पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पात नविन १५ (पंधरा) जणांना जगाराची संधि मिळू शकेल आणि त्यासाठी स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येईल.

**प्रश्न -** **श्री अभिजित पाटील** यांनी पुढे प्रश्न विचारला की विस्तारिकरण प्रकल्पासाठी किती झाडे तोडावी लागतील आणि त्या बदल्यात किती टक्के वृक्षलागवड करण्यात येईल?

**उत्तर -** प्रकल्प सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्प हा कार्यान्वित असून विस्तारिकरणासाठी कुठलीही वृक्षतोड करण्यात येणार नाही. मात्र आम्ही वेळोवेळी वृक्षलागवड, हरितपट्टा विकास करणार आहोत.

**प्रश्न -** यावेळी **श्री सुरेश पाटील, राहणार-कैरे गाव, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड** यांनी आक्षेप नोंदविला की प्रकल्प भूखंडात सर्व बांधकाम केलेले असल्यामुळे नविन वृक्षलागवड कशी करणार?

**उत्तर -** पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की हरितपट्टा विकासासाठी ३,०२५ चौरस मीटर क्षेत्र वापरण्यात येईल व त्यावर ३०२ वृक्षांची लागवड करण्यात येऊन त्याचे संवर्धन करण्यात येईल. प्रकल्पात ३३% हरितपट्टा विकसित करणे बंधनकारक आहे.

४) **श्री संदीप पाटील, राहणार-कैरे गाव, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-**

**प्रश्न -** प्रकल्प उत्पादनासाठी लागणा-या कच्चा मालात टोल्युन, मिथेनॉल, अल्कोहोल यासारखे अत्यंत घातक रसायने (Highly Hazardous Chemicals) आहेत. त्यांची साठवण क्षमता (storage capacity) किती हे सादरीकरणात नमूद केलेले नाही. त्याचप्रमाणे आग, अपघात टाळण्यासाठी कोणत्या उपाययोजना अंगिकारण्यात येतील? कारण मिथेनॉल, टोल्युन हे अत्यंत ज्वलनशील (highly flammable) आहेत. आग विझविण्यासाठी किती पाणी राखीव (Reserve) ठेवण्यात आलेले आहे, याचा उल्लेख सादरीकरणात देण्यात आलेला नाही. तसेच पाण्याची साठवण क्षमता ही जेवढी आवश्यक असणार आहे, तेवढा असेल काय?

**उत्तर -** पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्पात पाईपमधून, स्टोरेजमधून गळती न होण्यासाठी उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे जर आग लागली, तर ३० मीटर क्षेत्राबाहेर जाणार नाही, एवढ्या क्षमतेची अग्निरोधक सयंत्रणा उभारण्यात आलेली असून त्यासाठी पाणी राखीव (reserve) ठेवण्यात आलेले आहे.

श्री संदीप पाटील यांनी पुढे आक्षेप नोंदविला की मिथेनॉल, टोल्युन यापासून आग उद्‌भवल्यास त्यासाठी फोम लागेल. तर फोमचाही उल्लेख सादरीकरणात करण्यात आलेला नाही. श्री पाटील यांनी सांगितले की प्रकल्पाच्या भूखंडाशेजारीच त्यांचा भूखंड आहे. पर्यावरण सल्लागार यांनी फोमची व्यवस्था करण्यात येणार असल्याचे आश्वासन दिले.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण सल्लागार आणि प्रकल्प प्रवर्तक यांना सूचना दिली की उपस्थित मान्यवरांच्या मुद्द्याची नोंद घेण्यात आलेली असून उपस्थित व्यक्तीने केलेल्या सूचनेची नोंद घेऊन त्यासाठी प्रस्तावित खर्च व देखभाल खर्च याची नोंद घेण्यात येऊन त्याची तंतोतंत अंमलबजावणी करण्यात यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पुढे सांगितले की येथील काही उद्योगात तसेच औद्योगिक परिसरात आग लागण्याच्या घटना घडल्या, त्यावेळी

नुसते पाणी मारून उपयोग होत नाही, तरी फोमची व्यवस्था करण्याची सूचना ही योग्य आहे.

येथे **श्री सुरेश पाटील, राहणार-कैरे गाव, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड** यांनी सांगितले की आमचे कैरे गाव हे कंपनीच्या लगतच आहे. त्यामुळे जर काही अपघात झाल्यास, संपूर्ण कैरे गाव हे बाधित होऊ शकते, त्यासाठी काळजी घेण्यात यावी.

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की जरी शासन वेळोवेळी आपत्ती व्यवस्थापन योजना (Disaster Management Plan) राबवित असते. जिल्ह्याची आपत्ती व्यवस्थापन योजना (Disaster Management Plan) ही मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तर तालुक्याची आपत्ती व्यवस्थापन योजना (Disaster Management Plan) ही प्रांताधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली राबविण्यात येते. मात्र भविष्याचा विचार करुन शासनाबरोबरच परिसरातील उद्योगसमुहांनाही एकत्रितपणे (Collectively) याबाबत क्रियाशील (active) होणे गरजेचे होणार आहे. त्यासाठी उद्योगसमुहांना अपघात, आपत्ती टाळण्यासाठी एकत्रितपणे अग्निरोधक यंत्रणा, पाण्याच्या ऐवजी फोमची व्यवस्था स्थापित करणे व आवश्यक तेव्हा उपलब्ध करणे गरजेचे होणार आहे.

५) **श्री गणेश पाटील, राहणार-कैरे गाव, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-**

**प्रश्न -** प्रकल्पात सोलर पॅनेल कार्यान्वित करण्याची योजना प्रस्तावित आहे काय?

**उत्तर -** पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की अक्षय उर्जा योजना अंतर्गत १५ किलोवॅट वीजनिर्मिती क्षमतेचे सौर पॅनल बसविण्यात येईल.

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना बैठकीचा समारोप करण्याची सूचना केली.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की बैठकीच्या सुरवातीस सांगितलेले आहे की ही जनसुनावणी आपले विचार, सूचना, टीकाटिप्पणी यांची नोंद घेण्यासाठीच आयोजित करण्यात आलेली असून येथे कोणताही निर्णय घेण्यात येत नाही. येथे उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय मुद्दे उपस्थित केलेले असून त्यास प्रकल्प सल्लागार यांनी उत्तरे दिलेली आहे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल. सदरहू इतिवृत मराठी व इंग्रजीत तयार करुन ते सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, प्राप्त झालेल्या लेखी सूचना, आक्षेप, प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेईल.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, यांनी मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी, पोलिस प्रशासन व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे आभार मानून मा. अध्यक्ष यांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी ही संपली असल्याचे जाहीर केले.

सोबत प्राप्त झालेल्या ०१ लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडत आहोत.

**(प्रशांत भोसले)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड भवन, सीबीडी बेलापुर,नवी मुंबई

**(जयवंत शं. हजारे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी, रायगड
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड भवन, सीबीडी बेलापुर,नवी मुंबई

**(संदेश शिर्के)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड,
जिल्हा - रायगड